# राजर्षी शाहू महाविद्यालयाची दुहेरी हॅट्ट्रिक

## शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला कबड्डी स्पर्धेत अजिंक्यपद

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

चुरशीच्या अंतिम सामन्यात कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाने इस्लामपूर संघाचा ४७-२४ अशा गुणफरकाने पराभव करून शिवाजी विद्यापीठ महिला कबड्डी स्पर्धेचे सलग सहावे अजिंक्यपद पटकावत दुहेरी हॅट्ट्रिक साधली. अटीतटीच्या सामन्यात आजरा महाविद्यालयाने वाई येथील किसन वीर ३७-३६ अशा केवळ एका गुणाने निसटता विजय मिळविला.

शिवाजी विद्यापीठातील क्रीडा संकुलातील क्रीडा विभागाच्या हॉलमध्ये मॅटवर ही स्पर्धा झाली. स्पर्धेचे उद्घाटन मंगल संभाजी पाटील यांच्या हस्ते आणि जिल्हा क्रीडा अधिकारी डॉ. चंद्रशेखर साखरे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. स्पर्धेत कोल्हापूर, सांगली, सातारा या विभागातील पहिल्या चार क्रमांकाचे एकूण १२ संघ सहभागी झाले होते. स्पर्धा प्रथम बाद व नंतर लिग पद्धतीने खेळविण्यात आली. पहिल्या उपांत्य सामन्यात इस्लामपूरच्या के. आर.पी. महाविद्यालयाने आजरा महाविद्यालयाचा ३५-२५ असा १० गुणांनी पराभव केला. कोल्हापूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाने वाईच्या किसन वीर महाविद्यालयावर ३९-२ असा एकतर्फी विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला.



**कोल्हापूर : महिला कबड्डी स्पर्धेचे अजिंक्यपद पटकाविणारा राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाचा संघ. सोबत मान्यवर-प्रशिक्षक-मार्गदर्शक.**

**राजर्षी शाहू महाविद्यालयाचा संघ :** मृणाली टोणपे, वसुंधरा माने, प्रतीक्षा पिसे, प्राजक्ता देसाई, प्राजक्ता पाटील, स्नेहल शिंदे, गोपिका इळके, गायत्री पाटील, वसुधा माने, अमृता सांगले, स्मिता शिंदे, शामल पाटील. प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडिगिरी, शुभदा माने. बक्षीस समारंभ शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते आणि क्रीडाविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी प्रा. संभाजी पाटील, डॉ. रमेश भेंडिगिरी, डॉ. बाबासाहेब उलपे, प्रा. संजय पाटील, प्रा. गणेश लवंगारे आदी उपस्थित होते.

# गर्द वनराईत पक्ष्यांचा आनंददायी विहार

## शिवाजी विद्यापीठातील चित्र : देशी-विदेशी पक्ष्यांचे सहजपणे दर्शन

**प्रणाली पवार** : सकाळ वृत्तसेवा

उजळाईवाडी, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाने वर्षानुवर्षाच्या प्रयत्नातून वनराई जोपासलेली आहे. जवळपास ३३ एकरांपेक्षा जास्त जागेत हिरवेगार गवत, रंगबिरंगी फुले, विविध प्रकारची झाडे, स्वच्छ पाण्याचे तलाव आणि त्याच्या अवतीभोवती गर्द झाडी फुलवलेली आहे. ही वनराई पक्ष्यांसाठी उत्तम अधिवास ठरत आहे. गेल्या दहा वर्षांत विविध जातीच्या पक्ष्यांचा विहार विद्यापीठ परिसराला प्रसन्नतेचे जोड देत आहे. तसेच ठराविक ऋतूमध्ये परदेशी पाहुण्यांचे आगमन होते. या पक्षांचा किलबिलाट पर्यावरण पूरकतेचे रक्षण करताना मानवी मनालाही वेगळा आनंद देत आहे.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या परिसरात मोरांचा वावर नेहमी असतो.**

शिवाजी विद्यापीठाच्या अवतीभवती जवळपास ३३ एकर जागा, ही जागा खडकाळ भूप्रदेशाची, उंच टेकड्या, सखल भाग आणि काही टेकड्या हा पूर्ण भाग काळ्या मातीचा आहे. अशी बहुविध भू-वैशिष्ट्यांनी नटलेली ही जागा आहे. त्यावर गेल्या वीस वर्षांत विद्यापीठाने वृक्षारोपण केले आणि जवळपास अडीच हजारांहून अधिक झाडांनी जंगल उभे केले. कुठे तरू, तुरेदार गवत उगवले गेले. यातून वनराई बहरली.

विद्यापीठाचा परिसर, स्वच्छ हवा व पुरेसा ऑक्सिजन या आरोग्यदायी वातावरणात फिरण्याचा आनंद मानवाप्रमाणे पक्ष्यांनाही होतो. म्हणून विद्यापीठाच्या आवारात पक्ष्यांनी ठिय्या नक्की केला आहे. त्यामुळे येथे मोर-लांडोर सहजपणे आढळतात. भाषा भवनच्या मागे, बॉटनी विभागाच्या मागील भागात पोपटाचा मिठू मिठू आवाज सूर्योदय झाल्याचा आभास देतो. तर मानव संसाधन विभागाच्या मागील भागातील गर्द झाडीत साळुंखी, खंड्या, रंगबिरंगी चिमण्या, कोतवाल अशा पक्ष्यांची किलबिलाटसह शाळा भरते. रात्री-अपरात्री कुर्र-घुटुक असा आवाज करणारी घुबडे ही विद्यापीठाच्या निरव शांततेला छेद देतात.

अचानक भांडार विभागाच्या शेजारील झाडांवर चिमण्यांचा, कावळ्यांचा थवा गलका करू लागतो व जमिनीवर सरपटणारे मण्यार, धामण, विषारी-बिनविषारी सर्प आल्याची चाहूल देत इतरांना सावध करतात. या सगळ्या वनराईला दिवसभर चिमण्यांच्या चिवचिवाटाची गुंज असते. तसेच विविधरंगी चिमण्यांचे थवे इथल्या झाडापानांशी एकरूप झाल्याचे दिसते. अशा पक्ष्याच्या छटा विद्यापीठात तूर्त अनुभवायला मिळतात. पक्षी सप्ताहाच्या निमित्ताने त्यांचे संवर्धन करण्यासाठी विद्यापीठाने पावले वळवली आहेत.

### सायलेंट झोनची गरज

अलीकडच्या काळात विद्यार्थ्यांची, अधिकाऱ्यांची, कर्मचाऱ्यांची वर्दळ वाढत आहे. परिणामी वाहनांची वर्दळ, तीव्र प्रकाशझोत, हॉर्नचा कर्कश आवाज याचा त्रास पक्ष्यांनाही होत आहे. किमान स्वयंस्फूर्तीने कर्कश आवाजावर बंदी घातली, तरी पक्ष्यांचा त्रास निम्म्याने कमी होणार आहे. तसेच पक्ष्यांना उपयुक्त ठरणारी खाद्यपूरक रोपांची लागवड केली, तर पक्ष्यांचं जगणं पण समृद्ध होईल, अशी अपेक्षा आहे. पक्षी सप्ताहानिमित्त शिवाजी विद्यापीठ सायलेंट झोनची अंमलबजावणी करेल का? अशी अपेक्षा पक्षीप्रेमींकडून होत आहे.